# नगर परिषद,मलकापूर जि.बुलढाणा

## अंदाज पत्रकीय स्थायी समितीची विशेष सभा ठराव क्रं1 दिनांक 31/1/2020

मा.अध्यक्ष महोदय यांचे नोटीस क्रं.नपम/सभा/अध्यक्ष/340/2020 दि.31/01/2020 नुसार अंदाज पत्रकीय स्थायी समितीची विशेष सभा दि.31/1/2020 ला सभा बोलाविण्यात आली.सदर सभेकरीता आवश्यक असणारी गणपूर्ती पुर्ण झाल्याने सभापती यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रक मुख्याधिकारी यांनी तयार करुन ते प्राथमिकरित्या अंदाजपत्रकीय स्थायी समिती समोर सादर केले. अंदाज पत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत श्री.रशिदखॉं युसूफखॉं जमादार,अशोक दौलतराव कान्डेडे,राजेश विश्वनाथ पाटील यांनी सहभाग घेतला.मुख्याधिकारी यांनी प्राथमिकरित्या सादर केलेल्या अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता नगरसेवक श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सन 2020-21 चे अंदाजपत्रकात पूर्णा नदी मध्ये चेकडॅम बांधण्या करिता वार्षिक अंदाजपत्रकात 5 कोटीची तरतूद करणे तसेच सर्वे नं.3 आरक्षण क्रं.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशिय सभागृह व व्यापारी संकुलाचे उर्वरित विकास कामाकरिता 3 कोटी ची वैशिष्ट्यपूर्ण अनुदानातून तरतूद करण्याबाबत चा मेमो सभागृहात सादर करण्यात आला सदरची मागणी रास्त असल्याने त्याचा समावेश सन 2020-2021 चे अंदाजपत्रकात करण्यास मान्यता दिली.सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रक खालील प्रमाणे

### सन 2019-2020 चे सुधारित अंदाजपत्रक

| | |
|---|---|
| सुरवातीची शिल्लक | - 48,17,893 |
| एकुण उत्पन्न | - 34,94,38,826 |
| एकुण जमा | - 35,42,56,719 |
| एकुण खर्च | - 34,69,80,878 |
| अखेरची शिल्लक | 72,75,841 |

### सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रक

| | |
|---|---|
| सुरवातीची शिल्लक | - 72,75,841 |
| एकुण उत्पन्न | - 50,63,28,773 |
| एकुण जमा | - 51,36,04,614 |
| एकुण खर्च | - 50,61,09,645 |
| अखेरची शिल्लक | - 74,94,969 |

तसेच मुख्याधिकारी यांनी सन 2018-2019 ची विभाग निहाय वार्षिक तूट होती.

| | |
|---|---|
| 1. पाणी पुरवठा व जल निस्सारण सेवा | - 1,58,03,437 |
| 2. गटारे साफ करणे,घनकचरा वाहतूक व विल्हेवाट | - 10,17,196 |
| 3. रस्त्यावरील दिवाबत्ती | - 22,79,602 |
| 4. एस.जी.पी.व नवि 6 अ चे कर्ज | - 2,95,01,072 |
| 5. एकात्मिक विकास योजना | - 9,88,000 |

वरील तूट भरुन काढण्यासाठी मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या कृती आराखड्यातील तूट भरुन काढण्याकरीता दर्शविलेल्या अनु.क्रं. 1 ते 8 नुसार कृती आराखड्यातील उपाय योजनेमुळे उत्पन्नात भरीव वाढ होईल. अनु.क्रं. 1 ते 8 प्रमाणे तूट भरुन काढण्यासाठी कृती आराखड्याप्रमाणे कार्यवाही करण्यास ही सभा शिफारस करीत आहे.तसेच याबाबत निर्णय घेण्याकरीता सर्वसाधारण सभे समोर शिफारस करीत आहे

तरी सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रकास व सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत सर्वसाधारण सभे समोर ही सभा शिफारस करीत आहे

सुचक :- श्री रशीदखॉं युसूफखॉं जमादार

अनुमोदक :- श्री.अशोक दौलतराव कान्डेडे

ठराव सर्वानुमते मंजूर

sd/-

( हरीश महादेवसिंह रावल)

सभापती,

स्थायी समिती ,न.प.मलकापूर

सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रक खालील प्रमाणे

## सन 2019-2020 चे सुधारित अंदाजपत्रक

| | | |
|---|---|---|
| सुरवातीची शिल्लक | - | 48,17,893 |
| एकुण उत्पन्न | - | 34,94,38,826 |
| एकुण जमा | - | 35,42,56,719 |
| एकुण खर्च | - | 34,69,80,878 |
| अखेरची शिल्लक | - | 72,75,841 |

## सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रक

| | | |
|---|---|---|
| सुरवातीची शिल्लक | - | 72,75,841 |
| एकुण उत्पन्न | - | 50,63,28,773 |
| एकुण जमा | - | 51,36,04,614 |
| एकुण खर्च | - | 50,61,09,645 |
| अखेरची शिल्लक | - | 74,94,969 |

तसेच मुख्याधिकारी यांनी सन 2018-2019 ची विभाग निहाय वार्षीक तुट होती.

| | | |
|---|---|---|
| 1. पाणी पुरवठा व जल निस्सारण सेवा | - | 1,58,03,437 |
| 2. गटारे साफ करणे,घनकचरा वाहतूक व विल्हेवाट | - | 10,17,196 |
| 3. रस्त्यावरील दिवाबत्ती | - | 22,79,602 |
| 4. एम.जी.पी.व नवि 6 अ चे कर्ज | - | 2,95,01,072 |
| 5. एकात्मिक विकास योजना | - | 9,88,000 |

वरील तूट भरुन काढण्यासाठी मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या कृती आराखडयातील तुट भरुन काढण्याकरीता दर्शविलेल्या अनु.क्रं. 1,2,4 मध्ये दुरुस्त करुन अवैध कनेक्शन पासून उत्पन्न व दंडतसेच धोपेश्वर जुनी पाईप लाईन व इतर साहित्य भंगार हर्रासी करुन तूट भरुन याचा समावेश करण्यास व कृति आराखडयात इतर दर्शविलेल्या वाढीव उत्पन्नापासून तूट भरुन काढण्यास सभागृहाने मान्यता दिली.

तरी सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रकास व सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत सर्वसाधारण सभे समोर ही सभा शिफारस करीत आहे.

सुचक :- श्री.अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक :- श्री.राजेश विश्वनाथ पाटील

HMRawalpaw.

ठराव सर्वानुमते मंजुर

( हरीश महादेवसिंह रावळ)

अध्यक्ष

नगर परिषद.मलकापूर

# नगर परिषद,मलकापूर जि.बुलढाणा

## अंदाज पत्रकीय विशेष सभा ठराव क्रं1 दिनांक 28/2/2020

मा.अध्यक्ष महोदय यांचे नोटीस क्रं.नपम/अध्यक्ष/विसभा/619/2020 दि.24/02/2020 नुसार अंदाज पत्रकीय विशेष सभा दि.28/2/2020 ला सभा बोलविण्यात आली.सदर सभेकरीता आवश्यक असणारी गणपूर्ती पुर्ण झाल्याने सभापती यांचे आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.सन 2019-20 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2020-21 चे नविन अंदाजपत्रक मुख्याधिकारी यांनी तयार करुन ते प्राथमिकरित्या मंजुरातीस स्थायी समिती समोर सादर केले. त्यास अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभा ठराव क्रं.1 दि.31/1/2020 नुसार मान्यता देवून सव साधारण सभेस मंजूर करण्याकरिता शिफारस केली. अंदाज पत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत श्री.रशिदखाँ युसुफखाँ जमादार,अशोक दौलतराव वानखेडे,राजेश विश्वनाथ पाटील,अनिल शिवरतन गांधी,राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सहभाग घेतला.श्री.अनिल शिवरतन गांधी यांनी अंदाजपत्रकासोबत जोडलेल्या तुट भरुन काढण्याकरिता कृति आराखडया बाबत लेखी मेमो सादर केला.

नगर परिषदेचे लेखापाल यांनी सन 2019-20 सुधारीत अंदाजपत्रक व सन 2020-2021 नविन अंदाजपत्रक वाचून दाखविले तसेच तूट भरुन काढण्यासाठी मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या कृती आराखड्यातील तूट भरुन काढण्याकरीता दर्शविलेल्या अनु.क्रं. 1 ते 7 नुसार कृती आराखड्यातील उपाया योजनेमुळे उत्पन्नात भरीव वाढ होईल.असे सभागृहाचे निदर्शनास आणले चर्चेत सहभागी अनिल शिवरतन गांधी यांनी सभागृहाचे निदर्शनास आणून दिले की, कृति आराखडा मधील अनु क्रं.1 मध्ये मालमत्ता कराच्या शास्ती पासून मिळणाऱ्या उत्पन्न बाबत त्यांनी नमूद केले की, शास्ती रद्द करण्याकरिता नगर परिषदेने ठराव घेवून शासनाकडे शास्ती रद्द करण्याबाबतचे प्रकरण प्रलंबीत असतांना शास्ती पासून दर्शविण्यात येणारे उत्पन्न तसेच पाणी पुरवठा नियमित नसंताना मुद्दा क्रं.4 थकीत पाणी करावर शास्ती लावण्याबाबत तसेच पाणीकर वाढ करण्यास विरोध दर्शविला मात्र तूट भरुन काढण्याकरिता शहरात अवैध नळकनेक्शन शोध मोहिम राबवून शहरातील अवैध नळ कनेक्शन वर दंड आकारुन नियमित केल्यास नगर परिषदेच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल तसेच धोपेश्वर जुनी पाईप लाईन व इतर साहित्य भंगार हर्रासी करुन तूट भरुन काढणे शक्य होईल असे सभागृहात सुचलि.सभागृहाने त्यास मान्यता दिली.

चर्चेत सहभागी होतांना श्री.रशिदखाँ युसूफखाँ जमादार यांनी पारपेठ ला जाण्याकेरिता नविन बांधण्यात आलेल्या पुला आजू बाजू संरक्षण भिंती करिता रु 2 कोटी तसेच राजेश विश्वनाथ पाटील यांनी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जॅकवेल ते पुला पयंत संरक्षण भिती करिता रु.5कोटी व अनिल गांधी यांनी चाळीसबिघा परिसरात व्यायामशाळा,अंडरग्राऊड ड्रेनज व उदयान सौंदर्यकरण करिता 6 कोटीची तरतूद करण्याची मागणी केली.लेखापाल यांनी सभागृहाचे निदर्शनास आणून दिले की वरील तरतूद एकाच वेळीस केल्यास वास्तववादी अंदाजपत्रक तयार होणार नाही शासनाकडून सदर कामाकरिता निधी उपलब्ध झाल्यास सन 2020-21 चे सुधारीत अंदाजपत्रक तरतूद करणे योग्य होईल. त्यास सभागृहाने मान्यता दिली.

(कृपया पुढील पानावर पहा)